# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

दुपार

**दिनांक ०८.१०.२०२५ बुधवार**

**१) मा. न्यायालयातुन आरोपीला कारावासाची शिक्षा :—**

दिनांक ०७.१०.२०२५ रोजी मा. प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी साहेब नागपुर श्रीमती बि.एम.एन देशमुख मॅडम यांनी त्यांचे कोर्टाचे केस क्र. २३७९/२०२५ मधील, पोलीस ठाणे प्रतापनगर येथील अप. क्र. १२४/२०२५ कलम ३०५(अ) ६२ भा.न्या.स. या गुन्ह्यातील आरोपी नामे हर्ष उर्फ एक्का महेन्द्र रामटेके वय २४ वर्षे, रा. गौतम बुध्द वार्ड, खैरलांजी, ता. तिरोडा, जि. गोंदीया याचे विरूध्द साक्षी पुराव्याअंती गुन्हा शाबीत झाल्याने, **आरोपीस कलम ३०५(अ) भा.न्या.सं. अन्वये ०६ महिने कारावासाची शिक्षा व २,०००/— रू. दंड आणि दंड न भरल्यास ०६ दिवस अतिरीक्त कारावासाची शिक्षा ठोठावली.**

दिनांक २७.०३.२०२५ चे २३.३० वा. ते दि. २८.०३.२०२५ चे ०५.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे प्रतापनगर हद्दीत, प्लॉट नं. ११०, गोरले ले—आउट, जयताळा रोड, नागपूर येथे राहणारे फिर्यादी नामे निखील उत्तेजनराव खोबे हे नेहमी प्रमाणे जेवन करून उन्हाळा असल्याने घराचे दार उघडे ठेवुन हॉलमध्ये झोपले असता, आरोपीने फिर्यादीचा ओपो कंपनीचा मोबाईल फोन चोरून नेला. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे प्रतापनगर येथे आरोपीविरूध्द गुन्हा नोंदविण्यात आला होता. आरोपीस दिनांक ३०.०३.२०२५ रोजी १९.२५ वा. अटक करण्यात आली होती.

गुन्हयाचे तपासी अधिकारी तत्कालीन पोहवा. दिनेश भोगे यांनी मा. कोर्टात तपासाअंती दोषारोपपत्र सादर केले होते. सदर खटल्यात सरकारी अभियोक्ता म्हणून ॲड. सौ. पुजा सार्वे यांनी तर, आरोपीतर्फे ॲड. श्री. स्वप्नील मोहीले यांनी काम पाहिले. सदर गुन्ह्यात कोर्ट पैरवी अधिकारी पोहवा. दिगांबर भोयर व गौतम ढोके यांनी काम पाहिले.

**२) परिमंडळ क्र. ४ अंतर्गत पोलीस ठाणे बेलतरोडी येथील कुख्यात गुंड हद्दपार :—**

पोलीस ठाणे बेलतरोडी हददीत गल्ली नं. १, महाकाली नगर झोपडपट्टी, नागपूर येथे राहणारा गुन्हेगार ईसम नामे युवराज नारायण वर्मा, वय २३ वर्षे याचेविरूध्द पोलीस ठाणे बेलतरोडी येथे गंभीर स्वरूपाचे विविध गुन्हे दाखल असुन, त्याचेवर वारंवार कारवाई करूनही त्याचे प्रवृत्तीत कोणतीही सुधारणा झाली नाही. नमुद गुन्हेगार इसमाचे वर्तणुकीत सुधारणा व्हावी, याकरीता बेलतरोडी पोलीसांनी आरोपीविरूध्द हद्दपार प्रस्ताव तयार करून, मा. पोलीस उपायुक्त, परीमंडळ क्र. ०४ नागपुर शहर याचेकडे सादर केला. मा. पोलीस उपायुक्त, परीमंडळ क्र. ०४, नागपुर शहर यांनी हददपार आदेश क्र. १४/२०२५ दिनांक ०७.१०.२०२५ अन्वये गुन्हेगारास नागपूर शहर व नागपुर ग्रामीण हद्दीतुन ०२ वर्षाकरीता हद्दपार करण्याचा आदेश पारीत केला. नमुद गुन्हेगाराचे हद्दपार आदेशाची अंमलबजावणी करण्यात आलेली आहे. खालील छायाचित्रातील हद्दपार ईसम नागपुर शहरात आढळुन आल्यास पो.ठाणे बेलतरोडी अथवा डायल ११२ वर कळवावे.



युवराज

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची दारूबंदी, ड्रंकन ड्राईव्ह कायद्या अंतर्गत करण्यात आलेली कारवाई :–**

दिनांक ०७.१०.२०२५ रोजी नागपूर शहर पोलीसांनी, सर्व पोलीस ठाणे हद्दीत **महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये ०५ केसेस तसेच, एन.डी.पी.एस कायद्यान्वये ०२ केसेस असे एकुण ०७ कसेसेमध्ये ०७ ईसमावर कारवाई करून रू. १८,७३,०२०/– चा** मुद्देमाल जप्त केला. **महाराष्ट्र जुगार कायद्यान्वये ०४ केसेसमध्ये १० ईसमावर कारवाई करून रू. ९९,८५०/– चा** मुद्देमाल जप्त केला.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये विविध कलमांखाली एकुण १,१८४ वाहन चालकांवर कारवाई करून एकूण रू. ३,४४,२५०/– रू. तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) सदर पोलीसांची कामगिरी :– प्रतिबंधीत तंबाखूजन्य पदार्थ विक्री करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल पोलीस आयुक्त नागपूर शहर यांचे संकल्पनेतुन **''ऑपरेशन थंडर – एकत्र येवुया, नशामुक्त समाज घडवुया''** मोहीमेअंतर्गत अंमली पदार्थ विक्री करणारे तथा जवळ बाळगणारे तसेच, अंमली पदार्थाचे सेवन करणारे गुन्हेगारांविरूध्द वेगवेगळ्या कारवाई सुरू आहेत. त्याच अंतर्गत,

दिनांक ०७.१०.२०२५ चे १२.२० वा. चे सुमारास, सदर पोलीसांचे तपास पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहिती मिळाली की, पोलीस ठाणे हद्दीत ईटारसी पुलीया जवळ, आर.बी.आय कॉलोनी, गोंडवाना चौक, सदर, नागपूर येथे एक ईसम शासनाने प्रतीबंधीत केलेला सुगंधीत तंबाखु, चुना सुपारी वापरून मशिनीद्वारे खर्राच्या पुडया तयार करीत आहे व विक्री करीत आहे. अशा खात्रीशीर माहितीवरून नमुद ठिकाणी रेड कारवाई केली असता तेथे आरोपी अज्जू राजेन्द्रप्रसाद यादव, वय २५ वर्ष, रा. बैरामजी टाऊन, खदान, नागपूर हा मानवीय शरिरास हानीकारक असलेला सुगंधीत तंबाखू व चुना यांचे मिश्रण करून खर्रा तयार करून साठवून स्वत:चे आर्थिक फायदयाकरीता बाळगतांना समक्ष मिळुन आला. आरोपीचे ताब्यातुन शासनाने प्रतीबंधीत केलेला सुगंधीत तंबाखु व सुपारीद्वारे तयार केलेला खर्रा एकुण १५ किलो तसेच खर्रा तयार करण्याच्या मशिनी एकुण ०८ नग असा एकुण किंमती अंदाजे २,५५,०००/–रू. चा मुद्देमाल मिळुन आल्याने जप्त करण्यात आला. फिर्यादी अमरनाथ यादव सोनटक्के, वय ४३ वर्ष, अन्न सुरक्षा अधिकारी, सह. आयुक्त अन्न व औषध प्रशासन, म.राज्य, सिव्हील लाईन, नागपूर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे सदर येथे आरोपी विरूध्द कलम १२३, २७५ भा.न्या.सं. सहकलम २६(१), २६(२)(iv), ३(१)(zz)(iv), २७(३)(ई), ३०(२)(अ), ५९ अन्न सुरक्षा मानके अधिनीयम २००६ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. आरोपीस अटक करण्यात आली आहे.

वरील कामगिरी मा. श्री. नित्यानंद झा, पोलीस उप आयुक्त (परि.क्र. २), मा. श्रीमती सुनिता मेश्राम, सहा. पोलीस आयुक्त (सदर विभाग) यांच्या मार्गदर्शनाखाली, वपोनि. अमोल देशमुख, पोनि. गुन्हे संजय सिंग, पोनि. प्रशासन राहुल तसरे, पोउपनि. निलेश घोगरे, पोहवा. आशिष बहाळ, दुर्गेश ठाकूर, मोहनसिंग ठाकूर, पोअं. आशिष जाधव व अंकीत ठाकरे यांनी केली.



**३) गुन्हेशाखा युनिट क्र. ५ पोलीसांची कामगिरी :— प्रतिबंधीत तंबाखूजन्य पदार्थ विक्री करणाऱ्या व तयार करणाऱ्या आरोपींविरूध्द वेगवेगळे गुन्हे दाखल.**

दिनांक ०७.१०.२०२५ चे १५.१० वा. ते १६.२० वा. चे दरम्यान, गुन्हेशाखा युनिट क्र. ५ पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे कपिलनगर हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून कामगार नगर, गौसिया मस्जिद जवळ, गल्ली नं. १, प्लॉट नं. ७३३ समोर, राहणारा आरोपी नामे मोहम्मद हसीन मोहम्मद शगीर अहमद वय ३६ वर्ष याचे घरा समोरील ऊभ्या चारचाकी वाहनाची पंचासमक्ष झडती घेतली असता, त्यामध्ये शासनाने प्रतीबंधीत केलेला सुगंधीत तंबाखु, पानमसाला विक्री करीता साठवून ठेवल्याने समक्ष मिळुन आल्याने त्याचे विरूध्द पोलीस ठाणे कपिलनगर येथे गुन्हा दाखल करण्यात आला. आरोपीस त्याचे जवळील मालाबाबत अधिक सखोल विचारपूस केली असता, त्याने त्याचा भाऊ नामे शेरू उर्फ तहसीन शगीर अहमद वय ३७ वर्ष याचा उप्पलवाडी नारी रोड, येथे प्रतिबंधक तंबाखू व ईतर साहित्य तयार करण्याचा कारखाना असल्याचे सांगीतले. त्यावरून नमुद ठिकाणी अन्न व औषधी प्रशासन विभागाचे अधिकारी यांचे समक्ष जावून पंचासमक्ष रेड कारवाई करण्यात आली. कारखान्यात प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखू व ईतर साहित्य मिळून आले. आरोपी हे स्वत:चे आर्थिक फायदयाकरीता शासनाने प्रतिबंधीत तंबाखुजन्य पदार्थ व गुटखा बेकायदेशीर अवैधरित्या तयार करून, विक्री करीता साठवणुक करतांना समक्ष मिळुन आले. आरोपींचे ताब्यातुन दोन्ही ठिकाणाहुन शासनाने प्रतीबंधीत केलेला वेगवेगळ्या कंपनीचा सुगंधीत तंबाखु, पानमसाला, गुटखा व ईतर साहित्य असा एकुण किंमती अंदाजे ५,५९,१३१/—रू. चा मुद्देमाल मिळुन आल्याने जप्त करण्यात आला. फिर्यादी श्रीमती अर्चना नागोराव खंदारे, वय ३८ वर्ष, अन्न सुरक्षा अधिकारी, सह. आयुक्त अन्न व औषध प्रशासन, म.राज्य, सिव्हील लाईन, नागपूर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे कपिलनगर येथे दोन्ही आरोपींविरूध्द कलम १२३, २१४, २२३, २७४, २७५ भा.न्या.सं. सहकलम २६(१), २६(२)(iv), ३(१)(zz)(iv), २७(३)(ई), ३०(२)(अ), ५९ अन्न सुरक्षा मानके अधिनीयम २००६ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. दोन्ही आरोपींना अटक करण्यात आली आहे. आरोपींना मुद्देमालासह पुढील कारवाईकरीता कपिलनगर पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे.

वरील कामगिरी मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल पोलीस आयुक्त नागपुर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपुर शहर, मा. श्री. वसंत परदेशी अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपुर शहर, मा. श्री. राहुल माकणीकर पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. अभिजीत पाटील सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांच्या मार्गदर्शनाखाली, पोनि. संदीप बुआ, सपोनि. गणेश कदम, विजय गिते, पोहवा. चंद्रशेखर गौतम, रूपेश नानवटकर, शेख नजीर, अनीस खान, प्रविण भगत, प्रमोद बावणे, नापोअं. राजू टाकळकर, गणेश ठाकरे, योगेशे महाजन, पोअं. विशाल नागभिडे, देवचंद थोटे, आशिष पवार, सुनिलकुमार यादव व रोशन तांदूळकर यांनी केली.

**४) लकडगंज पोलीसांची कामगिरी :— देहव्यावसाय करवुन घेणाऱ्या आरोपींचे घटनास्थळ एक वर्षाकरीता सिलबंद**

मा. पोलीस आयुक्त नागपूर शहर यांचे संकल्पनेतून मानवी तस्करी व व्यवसायीक लैंगीक शोसनाची जाळी उखडून टाकण्याच्या उद्देशाने नागपूर शहरात सुरू असलेल्या **''ऑपरेशन शक्ती अंतर्गत'' विवीध कारवाई करून गुन्हे दाखल करण्यात येत आहे. याच अंतर्गत**

दिनांक २४.०७.२०२४ चे ०८.१० ते १४.३० वा. चे दरम्यान, गुन्हेशाखा सामाजिक सुरक्षा विभागाचे अधिकारी व अंमलदार यांना माहीती मिळाली की, एक दिपा नावाची महीला ही देहव्यापाराकरीता महीला तथा मुली उपलब्ध करून देते. अशा मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून, सापळा रचुन पोलीस ठाणे लकडगंज हद्दीत लाल शाळे मागे, बजरंग सायकल स्टॅण्ड जवळ, गंगा जमुना वस्ती येथे रेड कारवाई केली असता, तेथे आरोपी महिला १) दिपा राजु कंचन वय ५० वर्ष २) निलम उर्फ गुड्डी उर्फ कल्लूबाई मनिष धनावत, वय ५५ वर्षे, दोन्ही रा. बदनापूरा, मोतीझील, ग्वालीयर, मध्य प्रदेश, ह.मु गंगाजमुना वस्ती, नागपूर हया स्वतःचे आर्थिक फायदयाकरीता पिडीत महिलांना पैशाचे आमिष देवून, देह व्यापाराकरीता ग्राहकांकडुन पैसे घेवुन, पिडीत महिलेस व ग्राहकाला घटनास्थळी देह व्यवसाय करीता जागा उपलब्ध करूत देताना समक्ष मिळुन आल्या. त्यांचे ताब्यातुन एक अल्पवयीन मुलगी व दोन पिडीत महिलांची सुटका करण्यात आली. आरोपीचे ताब्यातुन ०३ मोबाईल फोन, रोख १,०००/— रू. असा एकुण ३२,२४०/—रू. किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपींविरूध्द पोलीस ठाणे लकडगंज येथे कलम १४३, ३(५) भा.न्या.सं. सहकलम ३, ४, ५, ७ पिटा ॲक्ट अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. आरोपींना मुद्देमालासह पुढील कारवाईस्तव लकडगंज पोलीसांचे ताब्यात देण्यात आले होते.

लकडगंज पोलीसांनी गुन्हयातील आरोपी यांना त्यांचे जागेपासून निष्कासीत करण्याकरीता मा. पोलीस आयुक्त नागपूर शहर यांचेकडे प्रस्ताव सादर कलेला होता, त्यांचे आदेशान्वये कुंटनखान्या करीता वापरण्यात येत असलेली जंगम मालमत्ता गंगा जमुना वस्ती येथील घर क्र. ११०/१११, सर्कल नं. ११/१६, वार्ड क्र. ३७, चितेश्वर मंदीर रोड, गंगा जमुना वस्ती येथील तळ मजल्यावरील तिन रूम अनैतीक व्यापार प्रतिबंधक अधिनीयम कलम १८(१)(अ)(ब) अंतर्गत ०१ वर्षाकरीता सिलबंद/प्रतिबंध करणे संबंधाने मा. पोलीस आयुक्त नागपूर शहर यांचे अंतीम आदेश प्राप्त झाल्याने लकडगंज पोलीसांनी कायदेशीररित्या नमुद जागा सिंलबंद/प्रतिबंध केलेली आहे.

वरील कामगिरी मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. राजेन्द्र दाभाडे अपर पोलीस आयुक्त (उत्तर प्रभाग) नागपूर शहर, मा. श्री. राहुल मदने, पोलीस उप आयुक्त (परि.क्र. ३), मा. श्रीमती महेक स्वामी, पोउपआ आर्थिक, मा. श्रीमती. श्वेता खाडे, सहा. पोलीस आयुक्त (लकडगंज विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. हेमंत चांदेवार, सफौ. सुनिल जाधव, पोहवा. रामदास नरेकर, पोअं. दिपक लवंगे, मपोहवा. गिता बोरकर, मपोअं. प्रज्ञा रामटेके यांनी केली.

## (गुन्हे)

**१) पोलीस ठाणे राणा प्रतापनगर :— प्राणांतीक अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक २७.०९.२०२५ चे १९.३० वा. चे सुमारास, फिर्यादीचा भाऊ नामे प्रमोद सदई धुर्वे, वय २६ वर्षे, रा. गाव छाताकला, पोस्ट. वसूरीया ता. हरई, जि. म.प्र हा पोलीस ठाणे राणा प्रतापनगर हद्दीत सुर्वे नगर, गल्ली नं. ४ येथून जात असता त्यास दुचाकी वाहन क्र. एम.पी २२ झेंड.सि ३४४४ चे चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व धोकादायकरित्या चालवुन फिर्यादीचे भावास मागुन धडक देवून गंभीर जखमी करून पळून गेला. गंभीर जखमी यास उपचाराकरीता मेडीकल हॉस्पीटल येथे दाखल केले असता, उपचारादरम्यान डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केले होते.

याप्रकरणी पोलीस ठाणे राणा प्रतापनगर येथे अकस्मात मृत्यूची नोंद घेण्यात आली होती. फिर्यादी विनोद सदई धुर्वे, वय ३४ वर्षे, यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे राणा प्रतापनगर येथे सपोनि. पडळकर यांनी

आरोपीविरूध्द कलम २८१, १०६(१) भा.न्या.सं., सहकलम १३४, १७७, १८४ मो.वा.का अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**<u>२) पोलीस ठाणे जरीपटका :— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

दिनांक ०६.१०.२०२५ चे २१.०० वा. ते दि. ०७.१०.२०२५ चे ०१.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे जरीपटका हद्‌दीत, प्लॉट नं. ४९२, कृषीनगर, जरीपटका, नागपुर येथे राहणाऱ्या फिर्यादी सौ. मोनाली रोशन बघेले, वय ३४ वर्षे, हया त्यांचे राहते घराला कुलुप लावुन परिवारासह कोजागिरी कार्यक्रमासाठी दिराचे घरी, बाबादीपसिंग नगर येथे गेल्या असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे घराचे मुख्य दाराचे कुलूप व कडीकोंडा तोडुन, घरात प्रवेश करून बेडरूम मधील लाकडी आलमारीतील सोन्याचे वेगवेगळे दागिने वजनी ८५ ग्रॅम व चांदीचा कमरपट्टा ५० ग्रॅम असा एकुण २,५८,०००/— रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे जरीपटका येथे पोउपनि. ठाकरे ९८२२९२६५४९ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ), ३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**<u>पोलीस ठाणे धंतोली :</u>—** दिनांक ०७.१०.२०२५ चे १५.३५ वा. चे सुमारास, पोलीस ठाणे धंतोली हद्दीत डाऊन रेल्वे लाईनवर पोल क्र. ८३४ ते ८३६ दरम्यान एक अनोळखी ईसम वय अंदाजे ५० वर्ष, वयाचे रेल्वेने कटल्याने मृत अवस्थेत मिळुन आले. त्यांची ओळख पटलेली नसुन त्यांनी अंगात—पांढऱ्या रंगाचे फुलशर्ट व काळया रंगाची अंडविअर घातलेली होती. त्यांचा चेहरा विद्रुप झालेला असून हात कटलेला होता. धंतोली पोलीसांनी कारवाई करून प्रेत मेडीकल हॉस्पीटल, येथे दाखल केले आहे.

याप्रकरणी प्राप्त वैद्यकीय सुचनेवरून पोलीस ठाणे धंतोली येथे पोउपनि. वाघ ८२७५४१२८२४ यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**स्वा/—**
**(अंकुश उ. राठोड)**
**पोलीस उप—निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**